सकाळ TODAY | पुणे, बुधवार, ४ मे २०२२

# खेड येथील वैष्णवची 'वजनदार' कामगिरी

राजगुरुनगर, ता. ३ : बंगलोर येथे २४ ते २७ एप्रिल दरम्यान झालेल्या 'खेलो इंडिया' युनिव्हर्सिटी गेम्समध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतानाराजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील वैष्णव ठाकूर याने वेटलिफ्टिंग या प्रकारात ९६ किलो वजनी गटात १३५ किलो 'स्नॅच' व १७८ किलो क्लीन अँड जर्क', असे एकूण ३१३ वजन उचलून सुवर्णपदकाची कमाई केली. पान ८ वर »



वैष्णव ठाकूर

## खेड येथील वैष्णवची 'वजनदार' कामगिरी

» पान १ वरून

या यशाबद्दल वैष्णवचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. या प्रसंगी खेडचे पोलिस निरीक्षक सतीश गुरव, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, राहुल लाड, संदीप भापकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, कैलास पाचारणे उपस्थित होते. वैष्णव याला प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी मार्गदर्शन आणि राहुल गायकवाड यांनी सहकार्य केले.